# B.K. BIRLA CENTRE FOR EDUCATION

SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
A CBSE DAY-CUM-BOYS' RESIDENTIAL SCHOOL

## TERM-1 EXAMINATION (2025-26)
## MARATHI

Class : VI — Duration : 3 Hrs
Date : 17.09.2025 — Max. Marks : 80
Admission No.: — Roll No.:

---

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :**

1. कृपया नीट तपासून घ्या की या प्रश्नपत्रिकेत 20 प्रश्न आहेत.
2. प्रत्येक भागाची उत्तरे शक्य तितक्या प्रयत्नाने एकाच ठिकाणी क्रमाने लिहा.
3. उत्तर लिहिण्यापूर्वी प्रश्नाचा क्रमांक प्रश्नपत्रिकेनुसार नक्की लिहा.
4. प्रश्नांचे निर्देश काळजीपूर्वक अवश्य वाचा.

---

### विभाग – अ (वाचन व आकलन )

**प्र 1 खालील पठित उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:–** (5X1=5)

एकदा एक शिकारी शिकारीसाठी जंगलात आला. त्याने एक जाळे शेतामध्ये पसरून ठेवले थोडयाच वेळात कबुतरांचा एक थवा आकाशातून उडत तेथे आला. सर्व कबुतरे दाणे टिपण्यासाठी खाली उतरले. आणि सर्वजण जाळयात अडकले होते. कबुतरांच्या प्रमुखाला एक युक्ती सुचली तो सर्वांना म्हणाला जाळयासकट आकाशात उडा. आणि जाळयासह ती कबुतरे दूर उडून गेली आणि वनात इतर प्राण्याच्या मदतीने जाळयातून मुक्त झाली. एकीच्या बळामुळेच हे शक्य झाले .

**(क)** शिकारी शिकारीसाठी कोठे गेला?

**अ** शेतात  **ब** वनात  **क** जंगलात

**(ख)** त्याने शेतामध्ये काय पसरून ठेवले?

**अ** फळे  **ब** जाळे  **क** दाणे

**(ग)** कोणाचा थवा आकाशात उडत होता?

**अ** कबुतरांचा  **ब** चिमण्यांचा  **क** घारींचा

**(घ)** कबुतरांच्या प्रमुखाला काय सुचली?

**अ** कला  **ब** विचार  **क** युक्ती

**(ङ.)** कशाच्या बळामुळे त्याची सुटका झाली?

**अ** एकीच्या  **ब** नेकीच्या  **क** श्रीमंतीच्या

**प्र 2 अपठित पदयांश –** **(5)**

एक चिमणी रोज
,घराच्या अंगणात यायची,
चिव चिव,चिव चिव करत
साद मला दयायची ।।

खडकीतून या दारावरून
डोकावून पाहायची
येऊ का आत म्हणून
जणू परवानगी घ्यायची

आई अंगणात मूठभर दाणे
भिरकावून दयायची
दगडी हौदात काठोकाठ
पाणी भरून ठेवायची

**(क)** अंगणात दाणे कोण टाकायची?

**अ** आई **ब** काकू **क** मावशी

**(ख)** पाणी कशात भरून ठेवायचे?

**अ** बादलीत **ब** ताटात **क** दगडी हौदात

**(ग)** चिमणी कोठून डोकावून पाहायची?

**अ** घरातून **ब** खिडकीतून **क** झाडावरून

**(घ)** चिमणी काय करी ?

**अ** चिव,चिव **ब** काव,काव **क** कुहू,कुहू

**(ड.)** आई शब्दासाठी समानार्थी शब्द आहे?

**अ** बहीण **ब** जननी **क** मामी

## खंड ख व्याकरण

**प्र 3 समानार्थी शब्द लिहा– ( कोणतेही दोन)** **(2)**

**1** भीती =
**2** गर्दी =
3 समय =

**प्र 4 विरुधार्थी शब्द – ( opposites ) ( कोणतेही दोन)** **(2)**

**1** विष x
**2** चांगला x
3 नवा ×

**प्र 5 लिंग बदला – ( change the gender ) ( कोणतेही दोन)** **(2)**

**1** बाबा =
**2** कुत्रा =
3 मामा =

**प्रश्न 6 वचन बदला – (write the plural noun ) ( कोणतेही दोन)** **(2)**

**1** चटका =
**2** ससा =
3 पंखा =

**प्र 7 खाली प्रत्यय लावून नवीन शब्द बनवा –** **(2)**

1 पुस्तका + खाली =

2 झाडा + खाली =

**प्र 8 खालील वाक्यातील सर्वनाम ओळखा :–** **(2)**

1 माझ्या घरी मी व माझे बाबा राहतो.

2 आईने माझी अभ्यासात मदत केली.

**प्र 9 काळ ओळखा –** **(2)**

1 आई उदया गावाला जाणार .

2 राधा अभ्यास करीत आहे.

**प्र 10 खालील वाक्यातील कियापद ओळखा –** **(2)**

1 गाडीचा दरवाजा बंद झाला.

2 राम सफरचंद खातो.

## खंड ग साहित्य

**प्रश्न 11 कोण कोणास म्हणाले लिहा –** **(2)**

1 ते खरे रे बाळांनों, पण ही व्यक्ती कोण आहे ?

2 मला फक्त पक्ष्याचा डावा डोळा दिसतोय.

**प्रश्न 12 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा – ( कोणतेही सात )** **(7x2=14)**

1 आई ही हाक ऐकताच कवीला कशाचे दुःख होते?

2 कावळा कुठे बसला आहे ?

3 द्रोणाचार्यांचे प्राण अर्जुनाने कसे वाचवले ?

4 लुईने आपल्या घराकडे धूम का ठोकली ?

5 युधिष्ठराने कोणती गोष्ट पितामहांना सांगितली ?

6 माणूस मोठमोठयाने का ओरडत होता ?

7 घरी कोणते पाहुणे येणार आहेत ?

8 इंदिरा थोरल्या आईकडून काय–काय शिकली?

9 थोरली आई तवंदीला आल्यावर मुलींचे लाड कसे पुरवीत असे?

**प्र 13 पठित गदयांश –** **(5)**

अर्जुनाने बाण सोडला .पक्ष्याच्या डाव्या डोळयाचा बाणाने अचूक वेध घेतला. अर्जुनाची पाठ द्रोणाचार्यानी थोपटली .द्रोणाचार्य म्हणाले , राजपुत्रांनो आपल्या नजरेसमोर फक्त आपले ध्येय गाठायचे असेल तर इतर सर्व अडथळे दूर केले पाहिजेत. तुम्हांला अनेकांना झाड दिसत होते. झाडाची पाने दिसत होती. काही जणांना तर पलीकडे आकाशही दिसले पण अर्जुनाला फक्त त्या पक्ष्याचा डावा डोळा दिसला म्हणजे ध्येय दिसले. अशी जर ध्येयावर नजर ठेवून राहिलात तर धनुर्विदयेत प्रगती करू शकाल .ज्याच्यावर बाण टाकायचा आहे तेच फक्त तेच नजरेत असले पाहिजे तरच तुम्ही लक्ष्याचा वेध घेऊ शकाल.

1 अर्जुनाची पाठ कोणी थोपटली ?

2 अर्जुनाला पक्ष्याचा कोणता डोळा दिसला ?

3 ध्येय गाठायचे असेल तर काय करायला पाहिजे ?

4 अनेकांना काय दिसले ?

5 बाण कोणी सोडला ?

**प्र 14 पठित पदयांश –** **(5)**

पैल तो गे काऊ कोकताहे।
शकुन गे माये सांगताहे ।।1।।
उड रे उड रे काऊ तुझे सोन्याने मढवीन पाऊ ।
पाहुणे पंढरीरावो घरा कैं येती ।।2।।
दहिभाताची उंडी लावीन तुझे तोंडी ।
जीवा पढिये त्याची गोडी सांग वेगी ।।3।।

**1** पैल तीरी कोण कोकताहे ?
**2** घरी कोण पाहुणे येणार आहेत ?
**3** कावळयाचे पाय कशाने मढविण्यात येणार आहेत ?
**4** कावळयाला काय खायला मिळणार आहे ?
**5** हा अभंग कोणी लिहिला आहे ?

**प्र 15 जोडया लावा –** **(4)**

**1** पाटली – बाहुल्या
**2** दागिना – पाखरे
**3** बाहुली – पाटल्या
**4** पाखरू – दागिने

**प्र 16 रिकाम्या जागा भरा –** **(4)**

**( मोहित / संसारातून / मागे / स्थिर )**

**1** मी नेहमी तिच्या ––––असे.
**2** तिने नवऱ्याच्या –––––– लक्ष काढले.
**3** ते –––––– झाले.
**4** जीवन –––– झाले होते.

**प्रश्न 17 आपल्या आवडत्या वस्तूसाठी एक आकर्षक जाहीरात तयार करा –** **(5)**

**प्रश्न 18 निबंध लेखन :– ( कोणताही एक )** **(5)**

1 माझा आवडता सण 2 माझा आवडता खेळ 3 माझा मित्र

**प्र 19 स्वपरिचय लिहा :– ( my self in marathi )** **(5)**

**प्र 20 पत्र लेखन :– ( कोणतेही एक )** **(5)**

आपल्या वाढदिवसाचे निमंत्रण देणारे पत्र आपल्या मामास लिहाः–

**किंवा**

आपली खुशाली कळविणारे पत्र बाबांना लिहा :–

============= यशासाठी शुभेच्छा ===============